पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी – १८, लेखा विभाग

क्र.लेखा/१अ/कावि/७३८९/२०१८

दिनांक – १/११/२०१८

**विषय: -** आस्थापनाविषयक बिले तपासणीचे कामकाजाबाबत.

**परिपत्रक,**

लेखा विभागामध्ये विविध विभागांकडून पगार बिले, स्थायी अग्रीम बिले, अतिकालीन भत्ता बिले, रजा प्रवास भत्ता बिले, पुरवणी बिले, फरक बिले इ. प्रकारची बिले अदायगीकामी पाठविण्यात येतात. सदर बिलांचे तपासणी कामकाज लेखा विभागामध्ये लिपीक / मुख्य लिपीक कर्मचा-यांकडे विभागून कामकाज वाटप करण्यात आलेले आहे.

तथापि, सदरची बिले लेखा विभागात सादर केल्यानंतर ब-याचदा त्यांचे अदायगीस विलंब होत असल्याबाबतच्या तक्रारी प्राप्त होत आहेत.

सबब प्रस्तुतचे परिपत्रकान्वये सर्व विभागप्रमुखांना कळविण्यात येते की महानगरपालिकेच्या कोणत्याही विभागामार्फत लेखा विभागाकडे सादर करण्यात येणा-या पगार बिले, स्थायी अग्रीम बिले, अतिकालीन भत्ता बिले, रजा प्रवास भत्ता बिले, पुरवणी बिले, फरक बिले इ. प्रकारच्या बिलांची स्वाक्षांकित पोहोच लेखा विभागातील बिले तपासणीचे कामकाज करणा-या संबंधित लिपीक / मुख्य लिपीक कर्मचा-यांकडून घेण्यात यावी.

तसेच लेखा विभागाकडील कर्मचा-याकडे बिल दिल्याची पोहोच असल्याशिवाय बिलांचे अदायगीबाबत बिलांबाची कोणतीही तक्रार ग्राह्य धरण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

मुख्य लेखा अधिकारी<br>
पिंपरी चिंचवड महानगरपालिका<br>
पिंपरी – ४११ ०१८

**प्रति,**<br>
सर्व संबंधित विभागप्रमुख

**प्रत,**<br>
सर्व संबंधित पगारबिल तपासणीस लिपीक / मुख्य लिपीक

Scanned by CamScanner